साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * गुरूवार, दि. ०१ मे २०२५ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.



१ मे

महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

– संपादक

# देशात होणार जातनिहाय जनगणना



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)::- बऱ्याच वर्षांच्या प्रतीक्षेनंतर व स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच देशात जातनिहाय जनगणना होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत बुधवारी (दि.३०) हा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. राजकीय व्यवहारांवरील मंत्रिमंडळ समितीने हा निर्णय घेतला. या बैठकीनंतर केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी, आगामी जनगणनेत जातींची गणना समाविष्ट केली जाईल, अशी माहिती पत्रकार परिषदेत दिली. दरम्यान, गेल्या काही वर्षांपासून काँग्रेससह विरोधी पक्षांनी जातनिहाय जनगणनेची मागणी लावून धरली होती. जनभावनेचा रेटा पाहून अखेर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी देशभर जातनिहाय जनगणेचा ऐतिहासिक निर्णय घेतला. केंद्रीय मंत्री वैष्णव म्हणाले, १९४७ पासून जातनिहाय जनगणना एकदाही झालेली नाही. काँग्रेस सरकारांनी नेहमीच जातीय जनगणनेला विरोध केला आहे. २०१० मध्ये दिवंगत डॉ. मनमोहन सिंग म्हणाले होते की, जातीय जनगणनेचा मुद्दा मंत्रिमंडळात विचारात घेतला पाहिजे. त्यानंतर या प्रकरणाचा विचार करण्यासाठी मंत्र्यांचा एक गट स्थापन करण्यात आला. बहुतेक राजकीय पक्षांनी जातीय जनगणनेची शिफारस केली. असे असूनही काँग्रेस सरकारने सर्वेक्षण किंवा जात जनगणना करण्याचा निर्णय घेतला नाही.

काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांनी जातीय जनगणनेचा वापर केवळ राजकीय शस्त्र म्हणून केला आहे. काही राज्यांनी जातनिहाय सर्वेक्षण केले आहे. काही राज्यांनी केवळ राजकीय दृष्टिकोन ठेवून असे सर्वेक्षण अपारदर्शक पद्धतीने केले आहे. राजकारणामुळे आपली सामाजिक बांधणी नष्ट होऊ नये म्हणून सर्वेक्षणांऐवजी जनगणनेतच जातींची गणना समाविष्ट केली पाहिजे, असा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आल्याचे श्री वैष्णव म्हणाले.

मंत्री श्री वैष्णव म्हणाले, जाती किंवा लोकसंख्येचा कोणताही डेटा अधिकृत जनगणनेतून घेतलेला नाही. हे सर्वेक्षणातून घेतले आहे. केवळ केंद्र सरकारच जनगणना करू शकते. जनगणनेवेळी प्रत्येक व्यक्तीकडून डेटा गोळा केला जातो. सर्वेक्षण मात्र लोकसंख्येच्या नमुना किंवा उपसमूहातून डेटा गोळा करते. भारतीय संविधानाच्या कलम २४६ नुसार, जनगणनेचा विषय सातव्या अनुसूचीमध्ये केंद्र सूचीमध्ये ६९ व्या स्थानावर आहे. ***

### ब्रिटिशांनी केली होती जातनिहाय जनगणना

देशात १८८१ मध्ये पहिली जातनिहाय जनगणना ब्रिटिशांनी केली होती. १९३१ पर्यंत जातनिहाय जनगणना होत होती. तिचा अहवालही प्रसिद्ध होत असे. १९४१ मध्ये जातनिहाय जनगणना करण्यात आली होती. परंतु त्याचा डेटा जाहीर करण्यात आला नव्हता. स्वतंत्र भारताची पहिली जनगणना १९५१ मध्ये झाली. ती जातीवर आधारित नव्हती. मात्र यामध्ये अनुसूचित जाती आणि जमातींची गणना करण्यात आली. संविधानात त्यासाठी संवैधानिक तरतूद असल्याने ही मोजणी देखील करण्यात आली.

## आ.मुंडे यांच्या हस्ते होणार शासकीय ध्वजारोहण

परळी वैजनाथ, (बातमीदार):- महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र राज्याच्या ६६व्या स्थापना दिनानिमित्त, दि. १ मे २०२५ रोजी सकाळी ८.०० वा., परळी येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तहसील कार्यालय प्रांगणात मुख्य शासकीय ध्वजारोहणाचा समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात मा.आ.श्री. धनंजय पंडीतराव मुंडे (विधानसभा सदस्य, परळी) यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण होणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन अरविंद लाटकर, उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, व व्यंकटेश मुंडे तहसीलदार परळी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

या शासकीय समारंभात विविध विभागांचे अधिकारी, पोलीस प्रशासन, शिक्षक, विद्यार्थी, सेवाभावी संस्था, तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. ध्वजारोहण कार्यक्रमास सर्व नागरिकांनी उपस्थित राहून महाराष्ट्र राज्याच्या गौरवशाली वाटचालीला सलामी द्यावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. ***

## दिवाणी व फौजदारी नूतन इमारतीचा कोनशिला समारंभ

बीड, (जि.मा.का.):- परळी वैद्यनाथ येथे बांधण्यात येणा-या दिवाणी आणि फौजदारी न्यायालय नूतन इमारतीचा कोनशिला समारंभ गुरुवार दि. १ मे २०२५ रोजी, महाराष्ट्र दिनी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नितीन भगवंतराव सूर्यवंशी यांच्या हस्ते सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

या कार्यक्रमास राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे तसेच मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती रविंद्र मधुसूदन जोशी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीडचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद लक्ष्मीकांत यावलकर हे असतील. या कोनशिला समारंभास उपस्थित रहावे असे आवाहन परळी वकील संघाचे अध्यक्ष अॅड हरिभाऊ गुटटे आणि दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) तथा न्यायदंडाधिकारी दीपक बोर्डे यांनी केले आहे. ***

# युपीएससी परीक्षेतील यशाबद्दल अक्षय मुंडे यांचा न्यू हायस्कूल शाळेच्या वतीने सत्कार

परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील थर्मल कॉलनीतील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित नवीन प्राथमिक शाळा व न्यू हायस्कूल जुनियर कॉलेज चा माजी विद्यार्थी चि.अक्षय संभाजी मुंडे याने नुकत्याच जाहीर झालेल्या यूपीएससी परीक्षेतील निकालात देशातून ६९९ वा रँक मिळवत नेत्रदीपक यश मिळवले. त्याच्या ह्या यशाबद्दल न्यू हायस्कूल परिवाराच्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला.



शनिवारी (दि.२६) शाळेच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष तथा शालेय समितीचे ज्येष्ठ सदस्य बाळासाहेब देशमुख हे होते. तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून औष्णिक विद्युत केंद्राचे प्रभारी मुख्य अभियंता महेश महाजन, शालेय समितीचे सदस्य उत्तमराव देशमुख, मशिप्र मंडळाचे सदस्य अजय सोळंके, शालेय समितीचे सदस्य दिलीपराव देशमुख, सूर्यकांतराव देशमुख, मुख्याध्यापक एस.पी.देशमुख, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक डी.जी.शिंदे, पर्यवेक्षक बालासाहेब राठोड, उपप्राचार्य सुनील लोमटे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संजय सुरवसे यांनी स्वागतगीत गायले. प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री देशमुख यांनी केले. यावेळी माजी विद्यार्थी अतुल मुळे याने एमपीएससी परीक्षेत यश मिळवल्याबद्दल व प्रज्वल मुंडे याने एसएससी सीजीएल परीक्षेत यश मिळवल्याबद्दल या दोन्ही विद्यार्थ्यांचे पालक अनुक्रमे सुधाकर मुळे व हरिचंद्र मुंडे यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना अक्षय मुंडे याने त्याचे कौटुंबिक परिस्थिती हालाखीची असतानाही त्याने केलेला संघर्ष व यश मिळवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा सादर केला. यावेळी प्रा.रवि स्वामी, उपप्राचार्य श्री लोमटे यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे महेश महाजन, कार्यक्रमाचे अध्यक्ष बाळासाहेब देशमुख यांचीही समायोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.बी.आर. चव्हाण यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.राजू कोकलगावे यांनी केले. कार्यक्रमासाठी प्राथमिक विभाग, माध्यमिक विभाग व कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. **

# आ.धनंजय मुंडे, मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत २ मे रोजी परळीत ब्राह्मण सभेचा ४५ वा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी वैजनाथ येथे २ मे रोजी ब्राह्मण बहुद्देशीय सभा आयोजित ४५ वा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा होणार असुन या सोहळ्यात २० बटुंवर वेदोक्त पद्धतीने सामुदायिक उपनयन संस्कार करण्यात येणार आहेत. दत्तधाम परभणीचे पिठाधिपती प. पु. मकरंद महाराज, भागवतमर्मज्ञ ह.भ.प बाळुमहाराज उखळीकर यांच्यासह संत व विद्वतजणांची आशिर्वचनपर उपस्थिती तसेच मंत्री पंकजाताई मुंडे,आ.धनंजय मुंडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. ब्राह्मण बहुद्देशीय सभा परळी वैजनाथ आयोजित ४५ वा उपनयन सोहळा मिती वैशाख शु. ५ शके १९४७ शुक्रवार दि. २ मे २०२५ वेळ : सकाळी १०.३१ वा. प्रवचनमंडप, वैद्यनाथ मंदीर जवळ, परळी वैजनाथ येथे शानदार आयोजनाने पार पडणार आहे.या सोहळ्यात परभणीचे पिठाधिपती प. पु. मकरंद महाराज,प्रसिद्ध भागवताचार्य व किर्तनकार भागवतमर्मज्ञ ह.भ.प बाळुमहाराज उखळीकर यांचे शुभाशिर्वाद लाभणार असुन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. मराठवाड्यातील विविध ठिकाणच्या २० बटुंवर सामुदायिक उपनयन संस्कार करण्यात येणार आहेत.

तरी या शुभसोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहवे असे आवाहन ब्राह्मण बहुउद्देशीय सभेच्या वतीने करण्यात आले आहे. ***

# परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्गाचे रखडलेले काम त्वरित पूर्ण करा- ॲड.मनोज संकाये

परळी वैजनाथ (बातमीदार):- गेल्या तीन वर्षापासून परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्गाचे रखडलेले काम आज तागायत पूर्ण झाले नसून याला जबाबदार राष्ट्रीय महामार्गाचे संबंधित गुत्तेदार आणि अधिकारी हे जबाबदार आहेत याचा फटका प्रवाशांना बसत आहे. वाहतूक कोंडी निर्माण होऊन या मार्गावर अनेक अपघाताच्या घटना घडल्या आहेत त्यामुळे या महामार्गाचे रखडलेले काम त्वरित पूर्ण करा तसेच परळीतील डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाण पुलावरील वळणावरची संरक्षण भिंत त्वरित बांधा या मागणीसाठी मित्र मंडळाच्या वतीने परळी येथील उपजिल्हाधिकारी कार्यालयात उपजिल्हाधिकारी माननीय लाटकर साहेब यांना निवेदन दिले. यात त्यांनी विविध मागण्या केल्या आहेत. मागण्या मान्य न झाल्यास महाराष्ट्र दिनी परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्गावर मित्र मंडळाच्या वतीने धरणे आंदोलन केले जातील असा इशारा त्यांनी दिला.

निवेदनात म्हटले आहे की, परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्ग याचे काम संबंधित गुत्तेदाराकडून सुरू असून ते आज पर्यंत अपूर्ण आहे. संबंधित गुत्तेदार अतिशय निष्काळजी पणाने या मार्गाचे काम करत आहेत. औष्णिक विद्युत केंद्राचे जुने भांडार ते धर्मापुरी फाट्यापर्यंत पुलाचे आणि मार्गाचे काम अर्धवट रखडलेले आहे. त्यामुळे येथे वाहतूक कोंडी निर्माण होऊन असंख्य अपघात घडण्याचा धोका निर्माण झाला आहे आणि याच ठिकाणी अपघात घडले आहेत त्यामुळे प्रवाशांना आणि वाहनधारकांना स्वतःचा जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. त्याचबरोबर परळी शहरातील डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी उडान पुलावरील वळणावर संरक्षण भिंत पडल्याने तेथे दोघांचा मृत्यू झाल्याची घटना गेल्या दोन ते तीन महिन्यापूर्वी घडली आहे याबाबत अधिकाऱ्यांची




संपर्क साधला असता त्यांच्याकडून समाधानकारक उत्तर मिळत नाही. संरक्षण भिंत पडल्याने तीस ते चाळीस फूट वाहन खाली कोसळण्याची दाट शक्यता आहे त्याचबरोबर परळी राष्ट्रीय महामार्गावरील चेंबरी विश्रामगृहा जवळील पुलावरील झाडे झुडपे, मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहेत त्यामुळे वळणावर समोरचे वाहन दिसत नाही तेथेही अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे त्यामुळे तेथील झाडे झुडपे तोडून घ्यावीत त्याच ठिकाणी रोलिंग व कठडे पडल्याने अपघात होत आहेत जवळपास ५० फूट रोलिंग नसल्याने वाहनांना धोका निर्माण झाला आहे. सदरील निवेदनाच्या प्रति नामदार मंत्री पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, नामदार माननीय माजी मंत्री धनंजयजी मुंडे, माननीय जिल्हाधिकारी बीड, माननीय तहसीलदार परळी वैजनाथ आणि माननीय पोलीस निरीक्षक संभाजीनगर यांना मेलद्वारे पाठवल्या आहेत.

यावेळी अनिल चौधरी, काशिनाथ सरवदे, मुंजाभाऊ साठे ,दगडू भाले, सुंदर आव्हाड, संदीप चौधरी, गिरीश सलगरे, प्रवीण रोडे, संतोष कांबळे, देविदास मुंडे, प्रमोद गिरी, राम गडदे, राम चाटे, अनंत कातकडे, पापा क्षीरसागर, श्रीमंत मुंडे, गिवेश मिसाळ,दिनेश मिसाळ, श्याम जाधव आणि भास्कर नावंदे आदीसह मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. **

# भाजपा परळी शहराध्यक्षपदी उमाताई समशेट्टे यांची निवड

परळी वैजनाथ, (बातमीदार):- भारतीय जनता पक्षाच्या शहराध्यक्षपदी माजी नगरसेविका उमाताई समशेट्टे यांची निवड करण्यात आली आहे. राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या सूचनेनुसार भाजपा जिल्हा अध्यक्षांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे या निवडी जाहीर केल्या.



भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक निवडी प्रक्रिया राज्यभरात चालू आहे. या अंतर्गत शनिवार दि २६ एप्रिल रोजी बीड जिल्ह्यातील भारतीय जनता पार्टीच्या मंडळ अध्यक्षांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या. परळी शहराध्यक्ष पदी भाजपा जेष्ठ नेत्या उमाताई चंद्रकांतअप्पा समशेट्टे यांच्या नावाची निवड करण्यात आली आहे. दोन वेळा परळी शहरातील वेगवेगळ्या विभागातून उमाताई समशेट्टे परळी नगरपरिषदेवर निवडून आलेल्या आहेत. राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे व मा. खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या निकटवर्तीय म्हणून ओळख असलेल्या उमाताई समशेट्टे राजकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक व धार्मिक क्षेत्रातही त्यांचा सक्रिय सहभाग असतो. इनर्व्हील क्लब च्या परळी शाखेच्या अध्यक्ष म्हणून त्यांनी महिलांसाठी विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. सखी मंच च्या माध्यमातून त्यांनी महिलांचे अनेक प्रश्न व समस्या सोडवल्या आहेत. महिलांचे संघटन व बचतगटांच्या माध्यमातून महिलांनी तयार केलेल्या विविध गृहपयोगी वस्तुंना बाजारपेठ मिळवून देण्याचे काम त्यांनी केले आहे. योगासन शिबिर, विविध धार्मिक कार्यक्रम उमाताई समशेट्टे यांनी आयोजित केले आहेत. भाजपच्या परळी शहराध्यक्ष पदाची जबाबदारी दिल्यानंतर ना. पंकजाताई मुंडे व मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे व पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली परळी शहरात भाजपाचे संघटनकार्य वाढवणार असल्याचे नवनिर्वाचित भाजपा शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे यांनी सांगितले.

भारतीय जनता पक्षाच्या शहराध्यक्षपदी उमाताई समशेट्टे यांच्या निवडीबद्दल शहरात फटाके वाजवून आंनद व्यक्त करण्यात आला व सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे. उमाताई समशेट्टे यांच्या निवडीमुळे पक्ष कार्यकर्त्यांत उत्साह निर्माण झाला आहे. ***

# काँग्रेसच्या वतीने महाराष्ट्र दिनी परळीत सद्भाववना संकल्प सत्याग्रह

परळी वैजनाथ, (बातमीदार):- बीड जिल्ह्यातील जातीय विद्वेषाची धार कमी करुन सामाजिक सौहार्द निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून मस्साजोग ते बीड सद्भावना यात्रा काढल्यानंतर आता प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत काँग्रेसच्या वतीने महाराष्ट्रदिनी(१मे) परळीत सद्भावना संकल्प सत्याग्रह करण्यात येणार आहे.

स्व.संतोष देशमुख हत्याप्रकरणानंतर काहिसा जातीय विद्वेष निर्माण करण्याचा प्रयत्न झाला.यामुळे जनजीवन प्रभावित झाले.बीड जिल्ह्यातील सामाजिक सौहार्द टिकून रहावे. आठरापगड जातीधर्मातील सामाजिक जनजीवन हे सलोखा व गुणागोविंद्याचे असावे या दृष्टिकोनातून काँग्रेस पक्षाची राजकारण विरहित भूमिका आहे.या भूमिकेतूनच काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मस्साजोग ते बीड अशी सद्भावना यात्रा काढली होती.या यात्रेत बीड जिल्ह्यातील सर्व जातीधर्मातील नागरिक उत्स्फूर्त सहभागी झाले होते.याच अनुषंगाने पुढचा टप्पा म्हणून परळी वैजनाथ येथे महाराष्ट्र दिनी १ मे रोजी सकाळी १० ते २ सद्भावना संकल्प सत्याग्रह करण्यात येणार आहे. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खा.रजनीताई पाटील यांच्यासह काँग्रेसचे नेते उपस्थित राहणार असल्याची माहिती काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राहूल सोनवणे यांनी पत्रकार परिषदेत दिली.यावेळी काँग्रेसचे परळी शहराध्यक्ष सय्यद हनीफ, प्रकाश देशमुख, शशीशेखर चौधरी, प्रकाश मुंडे आदी पदाधिकारी उपस्थित होते. ***

# WAVES 2025 : भारताला कलात्मक भविष्याकडे नेणारा प्रकाशस्तंभ

भारतातील मीडिया आणि मनोरंजन क्षेत्र आज केवळ देशाच्या सांस्कृतिक प्रभावाचा एक भाग नाही, तर जागतिक स्तरावर प्रभाव टाकणारी एक शक्ती बनण्याच्या मार्गावर आहे. या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेली थअतएड २०२५ (थेॲश्रव ऑंवळे तळींरिश्र एपींशऔंरळपाशपीं डींाळीं) ही परिषद अत्यंत महत्त्वाची ठरते. १ ते ४ मे २०२५ दरम्यान जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे होणाऱ्या या परिषदेमुळे भारताची सर्जनशील क्षमता, तंत्रज्ञानातील प्रगती, आणि सांस्कृतिक समृद्धी यांचा संगम येथे एका जागतिक व्यासपीठावर सादर केला जाणार आहे.

वेव्हज २०२५ ही केवळ एक परिषद नसून, ती भारताच्या 'क्रिएट इन इंडिया' अर्थात भारतात निर्माण करा या नवदृष्टीकोनाचा केंद्रबिंदू आहे. भारतातील कला, साहित्य, संगीत, चित्रपट, ॲनिमेशन, गेमिंग, वेबटून्स आणि ॲनिमे या सर्व क्षेत्रांतून निर्माण होणाऱ्या आशयाचे जागतिकीकरण करण्याचा प्रयत्न या परिषदेच्या माध्यमातून केला जात आहे. यामागील मुख्य उद्दिष्ट म्हणजे भारताला एका जागतिक कंटेंट हबमध्ये रूपांतरित करणे, जिथे केवळ सर्जनशीलता नाही, तर आधुनिक तंत्रज्ञान, व्यावसायिक क्षमता, आणि जागतिक स्पर्धा यांचाही प्रभाव दिसेल.

भारतीय समाजाची एक महत्त्वाची ओळख म्हणजे सांस्कृतिक विविधता. हीच विविधता मनोरंजनाच्या प्रत्येक माध्यमात दिसून येते. मग तो चित्रपट असो, संगीत, नाटक, लोककला, कथाकथन किंवा नव्या पिढीचे ॲनिमेशन आणि गेमिंग कंटेंट असो. वेव्हज २०२५ मध्ये हाच सांस्कृतिक ठेवा जगासमोर मांडण्याचा प्रयत्न होणार आहे. परिषदेचा भर क्रिएट इन इंडिया या अभियानावर असून, हे अभियान भारतातील स्थानिक कलेला, प्रतिभेला, आणि नवकल्पनांना एक मोठं जागतिक व्यासपीठ देण्याचं काम करत आहे.

वेव्हज २०२५ अंतर्गत क्रिएट इन इंडिया चॅलेंज सीझन १ सुरू करण्यात आला आहे, ज्यामध्ये देशभरातील तरुण कलाकार, लेखक, ॲनिमेटर्स, गेम डेव्हलपर्स आणि संगीतकार यांना सहभागी होण्याची संधी आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून २५ विविध प्रकारांच्या स्पर्धा घेतल्या जात आहेत, जसे की वेबटून, मंगा, ॲनिमे, इलेक्ट्रॉनिक डान्स म्युझिक, गेम डिझाईन इत्यादी. या उपक्रमामुळे स्थानिक पातळीवर असलेल्या प्रतिभेला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मान्यता मिळण्याची दारे उघडली जात आहेत.

वेव्हज २०२५ च्या अजेंडामध्ये फक्त सर्जनशीलतेचा गौरव नाही, तर आशयाच्या सुरक्षिततेवरही भर दिला जात आहे. आजच्या डिजिटल युगात कंटेंट चोरी किंवा पायरेसी ही एक मोठी समस्या आहे. यावर उपाय म्हणून फिंगरप्रिंटिंग, वॉटरमार्किंग, आणि एआय-आधारित ट्रॅकिंग तंत्रज्ञान वापरण्याची गरज ओळखण्यात आली आहे. या क्षेत्रातील तज्ज्ञ आणि संशोधक परिषदेच्या माध्यमातून एकत्र येऊन अशा समस्यांवर उपाययोजना मांडणार आहेत.

या परिषदेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे जगभरातील मीडिया क्षेत्रातील लीडर, निर्माते, दिग्दर्शक, आणि धोरणकर्ते एकत्र येऊन WAVES ¦eclaAation 2025 तयार करणार आहेत. हे घोषणापत्र जागतिक मीडिया आणि मनोरंजन क्षेत्रातील सहकार्य, नियमावली, आणि नैतिकतेबाबत मार्गदर्शक ठरणार आहे. यामुळे भारताला या क्षेत्रातील जागतिक धोरणनिर्मितीत सहभाग घेण्याची संधी मिळेल. भारतातील मीडिया आणि मनोरंजन क्षेत्र हे सध्या सुमारे २.३ लाख कोटींचे असून, येत्या काही वर्षांत हे क्षेत्र ४.३ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल, असा अंदाज आहे. थअतएड २०२५ सारख्या उपक्रमांमुळे रोजगार निर्मिती, नवउद्योगांचे निर्माण, आणि परकीय गुंतवणुकीला चालना मिळण्याची शक्यता आहे. हे क्षेत्र तरुणांसाठी संधींचा धमाका घडवून आणणार आहे. विशेषतः ॲनिमेशन, व्हीएफएक्स, गेम डिझाईन, स्क्रिप्ट राइटिंग आणि डिजिटल मार्केटिंगसारख्या नव्या उपशाखांमध्ये. WAVES 2025 ही परिषद केवळ एक इव्हेंट नसून, भारताच्या मीडिया आणि मनोरंजन क्षेत्राचा जागतिक प्रवास सुरू करणारा एक ऐतिहासिक क्षण आहे. 'क्रिएट इन इंडिया' ही घोषणा आता केवळ नारा राहिलेली नाही, तर ती कृतीत उतरवण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. विविधतेने नटलेला भारत, आता जागतिक दर्जाचा कंटेंट तयार करणारा देश म्हणून उभा राहत आहे.

ही परिषद भारताच्या सांस्कृतिक, आर्थिक आणि सर्जनशील सामर्थ्याची जागतिक ओळख निर्माण करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. थअतएड २०२५ भारताला कलात्मक भविष्याकडे नेणारा एक प्रकाशस्तंभ ठरणार आहे. त्यामुळे या परिषदेची नोंद केवळ मनोरंजन क्षेत्रातच नाही, तर भारताच्या विकासगाथेतही घेतली जाईल.

**- सचिन अडसूळ**
जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर

संपादकीय...

# याचा फेर विचार व्हावा.!

**※ सुविचार ※**

**भूक असेल तेवढच खायचं हा पक्ष्यांचा नियम सर्वांनीच लागू केला तर जगात कुणीच उपाशीपोटी झोपणार नाही.**

परळी परिसर व तालुक्यात नागापूर येथील 'वाण', नंदनज-सारडगाव येथील 'बोरणा' व बोधेगाव येथील 'बोधेगाव' हे तीन मध्यम प्रकल्प आहेत. या शिवाय कन्हेरवाडी-अंबलवाडी, चांदापूर, हाळम-हेळम, मोहा, मलनाथपूर, खोडवा सावरगाव आदी ठिकाणी लघू प्रकल्प आहेत. शिवाय तालुक्यात विविध ठिकाणी इतरही छोटे-मोठे पाझर तलाव आहेत. या तालुक्यातील पाण्याचा प्रामुख्याने शेतीसाठी, पिण्यासाठी तसेच वीटभट्ट्यांसाठी उपयोग होतो. नागापूर येथील वाण नदीवर असलेला 'वाण' मध्यम प्रकल्प तालुक्यातील सर्वात मोठा मध्यम प्रकल्प आहे. या प्रकल्पातील पाण्याचा परिसरातील सुमारे पंचेवीस गाव, वाडी वस्तीला पिण्यासाठी, शिवारातील शेतीसाठी, तालुक्यातील पांगरी येथील वैद्यनाथ कारखान्यासाठी तसेच परळी शहराला पिण्यासाठी उपयोग केला जातो. पावसाळ्यात हा प्रकल्प भरल्यास किमान दोन वर्षे परळीकरांची पिण्याच्या पाण्याची चिंता मिटते. परंतु अलिकडे वाढत जाणारे तापमान, या तापमानामुळे प्रकल्पातील पाण्याचे होणारे बाष्पीभवन, शेतीसाठी व परिसरातील गावांसाठी पिण्याच्या पाण्याचा होणारा वाढता उपसा. यामुळे प्रकल्प भरूनही बऱ्याचवेळा पाणी कमी पडण्याचा प्रकार होतो आहे. पावसाळ्यात तालुक्यातील सर्व प्रकल्प भरले तर उन्हाळ्यात अनेक, प्रकल्प तळ गाठताहेत. पाण्याचा होणारा वाढता उपसा यामुळे असे होत आह. परळी तालुक्याचे वार्षिक पर्जन्यमान सुमारे साडे सातशे ते आठशे मिलिमिटर आहे. वार्षिक सरासरी एवढा पाऊस झाल्यास व तालुक्यातील विविध प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस बरसल्यास पावसाळ्यात तालुक्यातील सर्व प्रकल्प भरण्याबरोबरच नद्या, नाले दुथडी भरून वाहू लागतात. शिवार पाणीदार होते.

गेल्या काही वर्षापासून तालुक्यातील कन्हेरवाडी व नागापूर येथील वाण प्रकल्पातील पाणी गुरांसाठी म्हणून नदी पात्रात सोडण्याची मागणी ग्रामस्थ, राजकीय नेते, कार्यकर्ते आदीकडून प्रशासनाकडे केली जाते. यासाठी कार्यकर्ते, नेते आपली प्रतिष्ठा लावतात. आंदोलने, मोर्चे होतात. शेवटी प्रशासन या दोन्ही प्रकल्पातील पाणी काही प्रमाणात नदी पात्रात सोडते. हे पाणी नदी पात्रात सोडल्यामुळे नदी लगत असलेल्या शेत शिवाराला तसेच नागरी वस्तीला फायदा होतो. विहिरी, विंधन विहिरीच्या पाणी साठ्यात वाढ होते. शिवाय नदी पात्रात पाणी बरेच दिवस साठऊन रहाते. त्यामुळे गुरांचीही सोय होते. या जमेच्या बाजू असल्या तरी असे पाणी नदी पात्रात सोडल्यास आणि पाऊस लांबल्यास पाण्याचे मोठे संकट येऊ शकते. त्यामुळे उन्हाळ्यात कन्हेरवाडी, वाण प्रकल्पातील पाणी नदी पात्रात मोठ्या प्रमाणात सोडण्याचा प्रकार थांबवला जावा असे मत अनेक जाणकार व्यक्त करत आहेत. पाणी सोडल्यामुळे काहींचा फायदा होत असला तरी भविष्यात नुकसान मात्र अनेकांचे होऊ शकते. पाणी टंचाईचे मोठे संकट ओढाऊ शकते. त्यामुळे प्रशासनाने असे पाणी उन्हाळ्यात नदी पात्रात सोडण्याबाबत फेर विचार करावा असे सर्वांना वाटते आहे. दरम्यान, अलिकडे तालुक्यातील विविध प्रकल्पातील पाण्याचा मोठ्या प्रमाणात उपसा सुरू आहे. याबाबत प्रशासनाने लक्ष घालायला हवे. पाणी वाटपाचे नियोजन करायला हवे असे अनेकांचे मत आहे. विटभट्ट्यांसाठी मोठ्या प्रमाणात पाणी वापरले जाते. याबाबतही प्रशासनाने धोरण ठरवले पाहिजे, अशीही मागणी होते आहे. एकूणच उपलब्ध पाणी, पाण्याचे संकट याबाबत प्रशासनाने ठोस भूमिका घेऊन नियोजन करायला हवे. ****

## महाराष्ट्र दिनः इतिहास, महत्त्व आणि निर्मिती...

१ मे हा महाराष्ट्र दिन (महाराष्ट्र दिवस) म्हणून साजरा केला जातो. १ मे १९६० रोजी मुंबई पुनर्रचना कायदा लागू झाला. हा कायदा वैयक्तिक राज्याच्या निर्मितीची मागणी करणाऱ्या अनेक निषेध आणि चळवळींमुळे झाला. स्वतंत्र राज्याची मागणी सर्वप्रथम संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाने केली. या लेखात आपण महाराष्ट्र दिनाचा इतिहास आणि महत्त्व अभ्यासू.

**महाराष्ट्र दिन :-** महाराष्ट्र दिन, सामान्यतः 'महाराष्ट्र दिवस' म्हणून ओळखला जातो, हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील एक राज्य सुट्टी आहे, जो १ मे १९६० रोजी मुंबईच्या फाळणीपासून महाराष्ट्राच्या निर्मितीच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. महाराष्ट्र दिन हा सामान्यतः परेड, राजकीय भाषणे आणि समारंभ आणि महाराष्ट्राचा इतिहास आणि परंपरा साजरे करणार्या इतर विविध सार्वजनिक आणि खाजगी प्रसंगी संबंधित असतो. मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा आनंदोत्सव साजरा केला जातो.

**महाराष्ट्र दिनाचा इतिहास:-** बॉम्बे (मुंबई) राज्याचे १९६० मध्ये महाराष्ट्र आणि गुजरात या दोन राज्यांमध्ये विभाजन करण्यात आले. राज्य पुनर्रचना कायदा, १९५६ अंतर्गत, राज्याच्या सीमा परिभाषित केल्या गेल्या.

मराठी, गुजराती आणि कोकणी भाषिकांमध्ये मोठी तफावत असल्याने मुख्य मुद्दा भाषिक होता. मराठी भाषिकांसाठी स्वतंत्र राज्याची मागणी




१९४० मध्ये सुरू झाली आणि राज्य चळवळीसाठी आजच्या मुंबईत संयुक्त महासभा स्थापन करण्यात आली. तथापि, भारत छोडो आंदोलन आणि दुसरे महायुद्ध यांनी संघर्ष मागे ढकलला. वेगळ्या राज्याची बाजू मांडण्यासाठी अनेक आयोगांना दोन दशकांहून अधिक काळ लागला. १९५६ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरूंनी ५ वर्षांसाठी मुंबईला केंद्रशासित प्रदेश म्हणून घोषित केले. नंतर लोकसभेने द्विभाषिक बॉम्बे (मुंबई) राज्याचा ठराव मंजूर केला. मार्च १९६० मध्ये लोकसभेने राज्याचा ठराव मंजूर केला. एका महिन्यानंतर कनिष्ठ सभागृहाने मुंबई राज्याचा ठराव मंजूर केला. १ मे १९६० रोजी मुंबई राजधानीसह महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले.

**महाराष्ट्र दिनाचे महत्त्व:-** भाषणांपासून ते रंगीत परेडपर्यंत, महाराष्ट्र हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करतो. राज्य आणि केंद्र सरकारच्या अखत्यारीतील बहुतांश शाळा, महाविद्यालये आणि कार्यालये या दिवशी बंद असतात. महाराष्ट्र दिन शिवाजी पार्क, दादर येथे परेडद्वारे साजरा केला जातो, जेथे महाराष्ट्राचे राज्यपाल भाषण करतात.

राज्य सरकार आणि खाजगी क्षेत्र या दिवशी नवीन प्रकल्प आणि योजनांचा शुभारंभ करतात. महाराष्ट्र दिनानिमित्त राज्यभरात भारतीयांना दारूविक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. या घटकाविषयी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी खाली दिली पीडीएफ डाउनलोड करा:

**संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना कधी झाली?**

एस.एम.जोशी यांच्या निमंत्रणावरून केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखाली ६ फेब्रुवारी १९५६ रोजी बैठक झाली. त्यानुसार डाव्या पक्षांच्या पुढाकाराने ८ फेब्रुवारी १९५६ रोजी 'संयुक्त महाराष्ट्र समिती'ची स्थापना करण्यात आली. त्यात बिगर काँग्रेस पक्षांनी हजेरी लावली. (संग्रहित)

## महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

परळी वैजनाथ, (बातमीदार):- जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या ८९० व्या जयंतीनिमित्त संत गुरुलिंग मंदिरात बेलवाडी येथे महात्मा बसवेश्वराच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून माजी नगराध्यक्ष सोमनाथ आप्पा हालगे व महाराष्ट्र वीरशेव लिंगायत सभेच्या जिल्हाध्यक्ष तथा भाजपाचे अध्यक्ष उमाताई समशेटे यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी उमाताई समशेट्टी बोलताना म्हणाल्या की महात्मा बसवेश्वरांनी अकराव्या शतकामध्ये समानता व महिलांसाठी विशेष कार्य केले त्यांच्या कार्याचा ठसा समाजात आज सुद्धा दिसत आहे त्यांच्या त्या वेळच्या कार्यामुळे समाजामध्ये महिलांना समान वाटा मिळत आहे. यावेळी प्रमुख उपस्थिती संत गुरुलिंग स्वामी मंदिराचे सचिव ॲड गिरीश चौधरी समर्थ शिक्षक प्रसारक मंडळाचे सचिव प्रभाकर ईटके वक्रेश्वर मंदिराची विश्वस्त सुभाष भिंगोरे, शिवकुमार व्यवहारे, हनुमान व्यायाम चे उपाध्यक्ष त्रिंबक काटकर श्रीमती गोदावरी बाई चौधरी, विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्याम बुद्रे सचिव प्रा.सुधीर फुलारी सर उपाध्यक्ष शिवकुमार केदारी पत्रकार आत्मलिंग शेटे, संतोष जुजगर महाराष्ट्र वीरशैव लिंगायत तालुकाध्यक्ष माजी नगरसेवक महादेव ईटके महाराष्ट्र वीरशैव सभेचे शहराध्यक्ष नितीन समशेट्टी शिवसेनेचे माजी नगरसेवक रमेश चौडे विकास प्रतिष्ठानचे सहसचिव विकास हालगे वक्रेश्वर देवस्थान सदस्य प्रकाश खोत आधी यावेळेस मंचावर उपस्थित होते यावेळी भारतीय जनता पार्टीचे परळी शहराध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल सौ उमाताई समशेट्टी,हनुमान व्यायाम शाळेच्या अध्यक्षपदी वैजनाथ इटके, सामाजिक कार्यकर्ते ॲड मनोज सांकाये सामाजिक कार्याबद्दल, रुद्र भूमी उपाध्यक्षपदी निवडीबद्दल विकास हालगे, महादेव ईटके यांची हनुमान व्यायाम शाळेच्या संचालक पदी निवड झाल्याबद्दल प्रतिष्ठान तर्फे सत्कार करण्यात आला या स्पर्धेमध्ये रांगोळी चित्रकला व वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण केल्याबद्दल श्री शेखर फुटके सर गंगाधर शिरसागर सर शिवप्रसाद रजनाळे सर राजेश साखरे सर सोमनाथ गोपनपाळे सर आदींचा सत्कार करण्यात आला यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन स्वामी यांनी केले तर संचलन अशोक नावंदे सर आभार दत्तात्रय गोपनपाळे यांनी केले.

यावेळी रांगोळी स्पर्धेत प्रथम खुला गट भाग्यश्री स्वामी द्वितीय पूजा शिरसागर तृतीय श्रुती हालगे यांनी बक्षीस पटकावले लहान गटात प्रथम श्रेया घोंगडे द्वितीय पूर्वा प्रकाश फडकरी तृतीय रुद्रायणी परमेश्वर चौधरी निमित्त आयोजित चित्रकला स्पर्धा व वकृत्व स्पर्धा त्यांनी बक्षीस पटकावली चित्रकला स्पर्धेत प्रथम श्रेया घोंगडे द्वितीय रुद्र महेश बुद्रे तृतीय समीक्षा रामेश्वर चौधरी यांनी पारितोषिक पटकावले वक्तृत्व स्पर्धेत प्रथम समीक्षा रामेश्वर चौधरी दुतीय समृद्धी रामेश्वर चौधरी तृतीय चिरंजीव सिद्धांत शिवकुमार चौडे यांनी पारितोषिक पटकावली यावेळी चित्रकलेत बालगटात उत्तेजनार्थ कुमारी स्वरा गणेश स्वामी, समर्थ चौधरी, राघव रामलिंग चौंडे, पार्थ सिद्धेश्वर घोंगडे, विश्वास सचिन सर्वज्ञ यांना मिळाली यावेळी प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या स्पर्धकांना ३१०० द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्यांना २१०० रुपये तृतीय क्रमांक पटकावणारांना अकराशे रुपये व सन्मानपत्र पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आली. यावेळी बीड रेल्वे समितीचे जिल्हाध्यक्ष जीएस सौंदळे गुरुजी माजी मुख्याध्यापक रामलिंग आप्पा राजनळे रंगनाथ आप्पा इटके श्रीशैल बुरकुल शिवकुमार चौंडे महादेव आप्पा फडकरी शैलेश काटकर नाईकवाडे आप्पा इंजिनीयर अरविंद बेल्लाळे तलाठी रमाकांत गुजर प्रमोद गुजर बाळू राजमाने शिरीष तोडकरी शिवलिंग आप्पा वाघमारे उमाकांत पोपडे प्रा. चंद्रकांत खानापुरे सोमनाथ राजनळे गौरीशंकर मोदी सर सिद्धेश्वर घोंगडे संजय कोरे नरेश पिंपळे संदीप चौधरी अरविंद चौधरी परमेश्वर चौधरी अवधूत बुधवंत आधी सह महिला व पुरुष समाज बांधव बहुसंख्य संख्येने उपस्थित होते. ****

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतीलच असे नाही.)

**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**

※ वर्ष ०८ ※ अंक ५४ ※ पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) गुरूवार, दि. ०१ मे २०२५ ※ किंमत : २ रू.

# लोकाभिमूख व गतिमान अभियान राबवावे-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड, (जि.मा.का.):- १०० दिवसाच्या कार्यक्रमात जिल्हयातील प्रत्येक अधिका-यांनी नाविण्यपूर्ण,लोकाभिमूख, गतीमान अभियान राबवून स्वच्छता ठेवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांनी १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिमेचा दुस-या टप्प्यातील कार्यालयाचा मुल्यामापन अहवाल आढावा व्ही.सी व्दारे घेण्यात आला. या प्रसंगी त्यांनी हे आवाहन केले.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी,आदित्य जिवने, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासनाचे) शैलेस सुर्यवंशी तसेच विविध कार्यालयाचे कार्यालय प्रमुख व प्रतिनिधी उपस्थित होते.

याप्रसंगी जिल्हाधिकारी म्हणाले की, बीड जिल्हयामध्ये कार्यालयीन स्वच्छतेचा अभाव आढळून आला असून कार्यालयीन स्वच्छता हा पाया असून स्वच्छतेला प्रथम प्राधान्य द्यावे तसेच ही स्वच्छता केवळ अभियानापुरतीच मर्यादित न ठेवता कायम स्वरुपी ठेवावी.

१०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणेत कार्यालयाचा कायापालट, शौचालय, पिण्याचे पाणी, कार्यालयीन स्वच्छता, कर्मचा-यांच्या टेबलवर नेम प्लेट, थम मशीन या सुधारणेला गतिमानता मिळावी. नागरिकांसोबत व्यवहार करतांना संवेदनशिलपणे करावा.

कार्यालय प्रमुखास काही अडचणी असेल तर त्यांनी माझ्याशी संपर्क साधवा, प्रंलबित विषयी लवकरात लवकर सोडवावे यासंदर्भात अडचणी असेल तर टिपणी टाकावी किंवा ते काम का प्रलंबित आहे ते मुद्दे माझ्या निर्दशनास आणून द्यावेत.

आपणास निधीची कमतरता असेल तर डिपीसीतून निधीची मागणी करावी, निधीची उपलब्धता करून दिली जाईल. १०० दिवसाची कार्यालयीन मोहिम दुसऱ्या टप्प्यातील कामाची पीपीटी २ मे २०२५ पर्यंत कार्यालय प्रमुखाने सादर करावी अशी सूचना त्यांनी यावेळी केली.

आपल्या काही नाविन्यपूर्ण कल्पना असतील तर त्याही मांडाव्यात त्याचा जरुर विचार केला जाईल, जेणे करुन कार्यालये आणि सोबतच जिल्हयातील स्वच्छतेचाही प्रश्न सुटेल. असे ते म्हणाले. ****

## महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त आयोजित चित्रकला स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन



परळी प्रतिनिधी :- दि:- २८/४/२०२५ वार सोमवार सकाळी ठीक १० वाजता गुरलिंग स्वामी मंदिर बेलवाडी येथे जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण व पूजन करून चित्रकला स्पर्धा व वकृत्व स्पर्धेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती गुरुलिंग स्वामी मंदिर अध्यक्ष श्री दत्तापा ईटके गुरुजी, भारतीय जनता पार्टी शहराध्यक्ष सौ उमाताई समशेट्टी, ज्येष्ठ पत्रकारआत्मलिंगआप्पा शेटे, पत्रकार संतोष जुजगर, चंद्रकांतआप्पा समशेटी, विकास प्रतिष्ठानचे सचिव सुधीर फुलारी सर, अँड.गिरीश चौधरी, वैद्यनाथ बँक संचालक महेश निर्मळे, माजी नगरसेवक महादेव ईटके वीरशिव विकास प्रतिष्ठान अध्यक्ष श्याम बुद्रे, महाराष्ट्र राज्य रुद्र भूमी निवारण समिती उपाध्यक्ष विकास हालगे, महाराष्ट्र वीरशेव सभा शहराध्यक्ष शहराध्यक्ष नितीन समशेटी, गुरुलिंग स्वामी संस्थान सदस्य दयानंद स्वामी, प्रकाश खोत उपस्थित होते यावेळी परीक्षक म्हणून शेखर फुटके सर, शिवप्रसाद राजनाळे, , सोमनाथ गोपनपाळे, महेश वेरुळे, राजेश साखरे सर यांनी काम पाहिले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी नगरसेवक नरेश पिंपळे दत्तात्रय गोपानपाळे, , शिवलिंग वाघमारे , गणेश स्वामी, प्रकाश खोत, संदीप चौधरी, शिवकुमार चौंडे, मल्लिकार्जुन साखरे आदी उपस्थित होते. यावेळी असंख्य विद्यार्थ्यांनी चित्रकला व वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला. ****

## कॅनलच्या पाण्यात वाहून गेलेला मृतदेह १२ तासानंतर सापडला

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी जवळील नवीन औष्णिक विद्युत केंद्र परिसरात असलेल्या लोणी तांडा येथे उन्हाळी सुट्ट्यांसाठी आपल्या नातेवाईकांकडे राहायला आलेली दहा वर्षाची शाळकरी मुलगी जवळच असलेल्या कॅनलच्या पाण्यात वाहून गेल्याचा प्रकार काल (दि. २८) रोजी घडला. नगरपरिषद आपत्ती व्यवस्थापन विभागाने तब्बल १२ तास या मुलीचा शोध घेतला. दरम्यान (दि.२९ ) सकाळी उक्कडगाव ता. सोनपेठ जिल्हा परभणी जवळील कॅनॉलमध्ये या चिमुकलीचा मृतदेह आढळून आला आहे.

सध्या जायकवाडी धरणातून कॅनॉल मध्ये पाणी सोडण्यात आलेले आहे. या कॅनॉलला आलेल्या पाण्यामध्ये कपडे धुत असलेली शाळकरी मुलगी वाहून गेल्याची दुर्दैवी घटना सोमवार दि २८ रोजी घडली. परळी नगर परिषदेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाचे सुनील आदोडे,नितीन जगतकर निखील वाघमारे, निखील गोदाम, वाहनचालक विठ्ठल गित्ते आदींनी अथक प्रयत्न करून शोधमोहीम सुरु केली होती.काल रात्री उशिरा पर्यंतही या मुलीचा शोध लागला नाही. आज सकाळ पासूनच पुन्हा नगरपरिषदेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने शोध मोहीम सुरू केली असता उक्कडगाव तालुका सोनपेठ जिल्हा परभणी जवळील कॅनॉल मध्ये या मुलीचा मृतदेह आढळून आला आहे मयत मुलगी ही पुणे येथील शाळेत शिकायला होती.उन्हाळी सुट्टीत ती परळीला नातेवाईकांकडे राहयला आली होती. शिवकन्या अजय चव्हाण ( वय१० वर्ष) असे मयत मुलीचे नाव आहे. उत्तरीय तपासणीनंतर मृतदेह नातेवाईकांकडे सुपूर्द करण्यात आला.दरम्यान या शाळकरी मुलीच्या मृत्युने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. ***

